## मुंबई अधिवेशन हा राजकीय रमीचा डाव
## झिडकारलेल्यांना चुचकारण्याचे पंतप्रधानांचे तंत्र

*३१ ऑक्टोबर १९८३*

पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी या राजकीय रमीचा डाव खेळतात आणि त्या नेहमीच जिंकतात. पत्ते बरोबर नेमके कसे सरकवायचे, सिक्वेन्स अचूक कसा जुळवायचा यात त्यांचा हातखंडा आहे. अलीकडेच मुंबईत झालेले इंदिरा काँग्रेस महासमितीचे अधिवेशन म्हणजे या राजकीय रमीचाच डाव होता, अशी प्रतिक्रिया एका ज्येष्ठ नेत्याने माझ्याशी बोलताना व्यक्त केली. या अधिवेशनाचा त्याने लावलेला अन्वयार्थ मोठा सूचक व पडद्यामागील हालचालींवर प्रकाश टाकणारा आहे.

### अंतुले यांची चलाखी

महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री ए.आर. अंतुले यांना पक्षाच्या कार्यकारिणीच्या बैठकीला बोलावणे येताच ते एकदम हरभऱ्याच्या झाडावर चढले. पक्षाच्या नभांगणात पुन्हा अंतुले तारा तेजस्वीपणे तळपू लागल्याचा साक्षात्कार अनेकांना झाला. काही पत्रकारांनी लगेच अंतुले-आरती सुरू केली. अंतुले केंद्रीय मंत्रिमंडळात जाणार, अशी चर्चाही सुरू झाली. महासमितीच्या अधिवेशनाआधी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कार्यकारिणीची बैठक झाली. त्या वेळी खासदार झकेरिया यांनी काँग्रेस (स.) च्या शंकरराव गेडाम यांना अधिवेशनाचे निमंत्रण कसे पाठविले गेले, अशी विचारणा केली. त्यानंतर अंतुले यांनी माईक हाती घेतला व 'मी पक्षाचा सरचिटणीस होतो, असे घोटाळे होणे शक्य असते' वगैरे सांगितले. पण त्यांचा मुख्य मुद्दा होता की, मला काँग्रेस कार्यकारिणीने आमंत्रित केले आहे. ते त्यांनी तीन-तीनदा सांगितले. पण अंतुले यांना एकट्यालाच श्रीमती गांधींनी बोलावले नव्हते. काँग्रेस कार्यकारिणीचे सदस्य एकवीस आहेत. पण मुंबईतील बैठकीला एकूण हजर होते बावन्न. म्हणजे कायम निमंत्रित व अंतुले यांच्यासारखे विशेष निमंत्रित होते एकतीस! बिहारचे माजी मुख्यमंत्री जगन्नाथ मिश्रा, केरळचे ए.के. अँटनी वगैरेंनाही कार्यकारिणीस बोलावले होते. तेव्हा एकट्या अंतुले यांनाच हे खास निमंत्रण नव्हते.

### एक नव्हे, आठ

जम्मू-काश्मीरचे मीर कासिम यांनी काँग्रेस पक्ष सोडल्यानंतर आता इंदिरा काँग्रेसमध्ये मुस्लिमांचे प्रभावी प्रतिनिधी अंतुलेच बनणार, अशीही हवा उठवण्यात येते. पण त्या बाबतीतही श्रीमती गांधींनी अंतुले यांना फारसे महत्त्व दिले नाही. कार्यकारिणीला त्यांनी एका मुस्लिमाला खास बोलावले नाही; तर आठ मुस्लिमांना आमंत्रण दिले. श्रीमती अबिदा अहमद, श्रीमती अन्वरा तैमूर, आरिफ बेग, डॉ. रफिक झकेरिया, श्रीमती मोहसिना किडवाई, मुफ्ती मोहम्मद सईद, तारिक अन्वर यांनाही कार्यकारिणीचे आमंत्रण होते. मुस्लिमांना खूष ठेवण्याच्या दृष्टीने हे सारे केले गेले; पण त्यात केवळ अंतुले एकटे नाहीत तर इतरही आहेत, असेच श्रीमती गांधींनी या राजकीय रमीत दाखवून दिले. त्याशिवाय बहुसंख्य हिंदू राज्याचा मी पहिला मुख्यमंत्री ही अंतुले यांची गर्वोक्ती किती फोल आहे, हे आधीच्या मुस्लिम मुख्यमंत्र्यांची उदाहरणे देऊन श्रीमती इंदिरा गांधींनीच दाखवून दिले.

अल्पसंख्याकांवर वेगळा ठराव अधिवेशनात मांडला गेला, हे श्रीमती गांधींच्या सुज्ञपणाचे आणखी एक लक्षण राजकीय निरीक्षकांना वाटते. यापूर्वी केवळ अल्पसंख्याकांसाठी स्वतंत्र ठराव अधिवेशनात मांडला गेला नव्हता. तेव्हा अल्पसंख्याकांना दिलासा देणे, त्यांना खूष करणे हाही उद्देश यामागे असावा. त्यातही राजकीय पत्ते पिसणी झालीच. हा ठराव मांडला बुटासिंग यांनी आणि त्याला अनुमोदन दिले अंतुले यांनी. या दोघांचे बिलकूल पटत नाही, हे सर्वश्रुत आहे. बुटासिंग व अंतुले दोघेही काँग्रेस पक्षाचे सरचिटणीस होते, तेव्हापासून त्यांचे हाडवैर आहे. पण श्रीमती गांधींनी या ठरावावर दोघांनाही भाषणे करायला लावली ही त्यांच्या चाणाक्षपणाची एक खूण

त्यांच्याच पक्षाचे नेते मानतात.

### पक्षात चलबिचल

सध्या सत्तारूढ काँग्रेस पक्षात चलबिचलीचे वातावरण आहे. राज्यात अस्थिरता आहे. आंध्र, कर्नाटक हे एकेकाळचे पक्षाचे अभेद्य समजले जाणारे बालेकिल्ले विरोधी पक्षाच्या हातात आहेत, हे लक्षात घेऊन नव्याने पक्षात आलेल्यांना चुचकारणे, जवळ करणे ही नीतीही पंतप्रधानांनी अवलंबिल्याचे या अधिवेशनात स्पष्टपणे दिसून आले. १९८० नंतर पक्षात आलेले प्रियरंजनदास मुन्शी, ब्रह्मानंद रेड्डी, यशवंतराव चव्हाण यांची भाषणे करण्यासाठी केलेली निवड हा या नीतीचाच भाग आहे, असे मानले जाते. ज्या राज्यात अशांतता आहे त्या राज्यातील नेत्यांनाही पंतप्रधानांनी बोलायला लावले. उदा. पंजाबचे दरबारासिंग, आसामचे हितेश्वर सैकिया इ. एकेकाळी पक्षाच्या मर्जीतून जे उतरले त्यांनाही आपण महत्त्व देतो, हे दाखवून देण्यासाठी अंजय्यांसारख्यांनाही संधी दिली गेली.

### आता व्यंकटरामन

आंतरराष्ट्रीय स्थितीबाबतचा ठराव परराष्ट्रमंत्री पी.व्ही. नरसिंग राव यांनी न मांडता तो संरक्षणमंत्री आर. वेंकटरामन यांनी मांडला, हे येथील राजकीय वर्तुळात सूचक मानले जाते. मंत्रिमंडळात फेरफार केला जाणार असून त्या वेळी परराष्ट्र खाते व्यंकटरामन यांच्यावर सोपविले जाण्याची शक्यता आहे व म्हणूनच त्यांना हा ठराव मांडण्यास सांगण्यात आले असावे, असे अनुमान काढण्यात येत आहे. १९६७ पासून महासमितीची सर्व अधिवेशने पाहिलेल्या एका नेत्याने सांगितले की, आंतरराष्ट्रीय परिस्थितीवरचा ठराव यापूर्वी कधीही संरक्षणमंत्र्यांनी मांडला नव्हता.

ज्येष्ठ नेते यशवंतराव चव्हाण यांना मराठीतून भाषण करण्याची परवानगी देण्यातही त्यांचे भाषण सर्वांपर्यंत पोचू नये, हाच हेतू असावा. यशवंतराव हिंदी किंवा इंग्रजीतून भाषण करणार होते. पण श्रोत्यांनी 'मराठी मराठी' असा गिल्ला करताच त्यांना मराठीतून भाषण करण्याची मुभा दिली. श्रोत्यांत पाच टक्के मराठी भाषिक असावेत. तेव्हा त्यांचे भाषण सर्वांपर्यंत पोहोचलेच नाही, असेही जाणकार सांगतात.

### राजीव महिमा

पंडित जवाहरलाल नेहरू यांचे आयुष्यातील अखेरचे अधिवेशन होते मुंबईचे, तर राजीव गांधी यांचे पहिले अधिवेशन ठरले मुंबईचेच. या अधिवेशनात निदान काँग्रेस नेते व कार्यकर्त्यांनी राजीव गांधींना आपला नेता म्हणून स्वीकारले. पूर्वी संजय गांधींच्या काळात श्रीमती गांधी चांगल्या, पण संजय मात्र नाही, असे म्हणणारा वर्ग काँग्रेस पक्षात होता. संजय गांधींचे दुर्दैवाने अपघाती निधन झाले व राजीव गांधी राजकारणात आले. त्यांच्याबद्दल काँग्रेसजनांत आरंभी साशंकता होती. पण हलके हलके राजीव महिमा वाढत गेला नि आता काँग्रेस अधिवेशनात ते 'हिरो' होते. तेव्हा आता त्यांना काँग्रेसवाल्यांनी आपला नेता मानले आहे, असे आपले मत झाल्याचे एक निरीक्षक म्हणाला. राजीव गांधींच्या भाषणाच्या वेळी षण्मुखानंद सभागृह तुडुंब भरले होते व पूर्ण शांतता होती हेही याचे निदर्शक आहे, असेही तो म्हणाला. तेव्हा राजीव यांच्या राज्याभिषेकाचा जणू हा शुभारंभच झाला, असे म्हटले जाते.

पंजाब, आसाममधील स्थिती लक्षात घेता आगामी निवडणुकीत 'देशाचे ऐक्य टिकवण्यासाठी' आमच्याच पक्षाला मते द्या, या घोषणेभोवती इंदिरा काँग्रेसचा निवडणूक प्रचार केंद्रित होणार, हेही या अधिवेशनात स्पष्ट झाले. एकेकाळी 'गरिबी हटाव'च्या घोषणेच्या वलयाने पक्षाने निवडणुका जिंकल्या होत्या. आता देशाच्या ऐक्याच्या घोषणेचा वापर केला जाणार. त्यामुळे विरोधी पक्ष व फुटीर प्रवृत्ती देशाचे विघटन करणार, असा विरोधी पक्षावरील टीकेचा रोख राहणार. पंतप्रधानांनी हा सूर लावला आहेच. त्याच्याच टेप्स आता सर्वत्र ऐकू येणार.

### 'स्पिरिट ऑफ ७७'

सत्तारूढ पक्षाला विरोधी आघाड्या, युती यांच्यावर टीका करण्याखेरीज दुसरे काही सुचत नाही असे दिसते. एका बाजूला या आघाड्यांना 'विनोद' म्हणायचे; पण या विनोदाचीच गंभीर दखलही घेतली जात आहे. अलीकडेच प्रफुल्ल गोराडिया यांनी 'स्पिरिट ऑफ ७७ : अ सर्व्हे ऑफ अलायन्स पॉलिटिक्स' नावाची छप्पन्न पानी

पुस्तिका काढली. कलकत्त्याचे हे गृहस्थ तेवीस वर्षांचा जुना धंदा सोडून देऊन गेली चार वर्षे इंदिरा काँग्रेसचे काम करत (म्हणजे ते जुने निष्ठावंत नाहीत, तर नवे व म्हणून अधिक कडवे निष्ठावान असावेत) आहेत. या पुस्तिकेचे मुखपृष्ठ 'स्पिरिट' शब्दाच्या 'मद्यार्था'वर आहे! एका दारूच्या बाटलीवर (या दारूचे नावच 'स्पिरिट ऑफ ७७') मोरारजी देसाई, वाजपेयी व चरणसिंग यांची चित्रे काढलेली आहेत. दारूच्या बाटलीवर मोरारजीभाई म्हणजे कहरच झाला. तर या पुस्तिकेला प्रस्तावना आहे इंदिरा काँग्रेसच्या एक सरचिटणीस श्रीमती राजेन्द्रकुमारी वाजपेयी यांची. राष्ट्रीय स्तरावर आघाड्यांचे राजकारण हे फारच विषारी आहे. संयुक्त आघाड्या चांगले सरकार देऊ शकत नाही हे ठळकपणे, तातडीने सांगण्याची गरज आहे, असे श्रीमती वाजपेयी आपल्या प्रस्तावनेत म्हणतात. एखाद्या निवडणूक प्रचार पुस्तिकेसारखीच ही पुस्तिका आहे. निवडणूक घोषित होवो न होवो, तिच्या तयारीचाच हा एक भाग वाटतो.

□

– अशोक जैन

('राजधानीतून ... २' या पुस्तकातून)